# खाजगी मराठी शाळा कोणासाठी ?

शिक्षणहक्क समन्वय समितीने गेले तीन वर्षे खाजगी मराठी शाळांच्या मान्यतेसाठी आंदोलन चालविले आहे. १६ जुलै २०१२ पासून, बेमुदत सत्याग्रह पुण्यात, शिक्षण संचालकांच्या कार्यालयाबाहेर चालला आहे. सरकारने गेली पाच-सात वर्षे मराठी शाळांना मान्यता न देण्याचे धोरण अवलंबिले आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मात्र मुक्तहस्ते मान्यता दिली जात आहे. साहजिकच चालू असलेल्या अनेक मराठी शाळा 'अनधिकृत' असल्याचा आणि म्हणून फौजदारी शिक्षेस पात्र असल्याचा दावा महाराष्ट्र सरकार करीत आहे. प्रत्यक्षात या दिशेने कारवाईही अनेक शाळांवर केली जात आहे.

खाजगी मराठी शाळांच्या या लढ्यात प्रथमपासून सहभागी असल्यामुळे, कायद्यांपासून सरकारी वायद्यांपर्यंत आणि राजकीय नेत्यांपासून सर्वसामान्य शिक्षणप्रेमीपर्यंत अनेकांशी संपर्क येऊन, अनेक राजकीय विचारप्रणाली, वेगवेगळी मते, यांवर विचार करावा लागला. अनेकांनी 'खाजगी मराठी शाळा' यावर प्रश्न उपस्थित केले आणि याबाबतची भूमिका स्पष्ट करण्याचीही अपेक्षा केली. काहींचा मराठी शाळांना विरोध नव्हता. पण त्यांना 'खाजगी पण खटकत होते. काहींचा खाजगी शाळांना आक्षेप नव्हता पण इंग्रजी शाळाही मोठ्या प्रमाणावर असल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते. काहींच्या मनात मराठी शाळांविषयी आत्मियता आहे पण सरकारी शाळा असल्या पाहिजेत अशी त्यांची ठाम भूमिका आहे, काहींच्या मनात, खाजगी-आंतरराष्ट्रीय-जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली निर्माण झालेल्या भरपूर फी घेणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा शिक्षणसम्राटांनी नि राजकारण्यांनी उघडलेल्या नफेबाजी करण्याऱ्या शाळा इतक्या घट्ट बसल्या आहेत की, त्यांना खाजगी मराठी शाळा याही त्याच वर्गातील आहेत असे ठाम समीकरण आहे. समाजातील गरीब, वंचित, दलित, आदिवासी, भटके-विमुक्त या वर्गांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची चिंता असणाऱ्या प्रामाणिक मंडळींना सरकारी शाळाच या वर्गांमधील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहेत आणि खाजगी शाळा या विद्यार्थ्यांची पिळवणूकच करतील अशी भावना आहे. खाजगी मराठी शाळांचे आंदोलन चालविणारांनी, ही सर्व मत-मतांतरे आणि भाव-भावनांचा आदर करून त्यांचे समाधान करणारी उत्तरे दिली पाहिजेत, असे वाटते. अशा समाधानपूर्तीतूनच खाजगी मराठी शाळांच्या अस्तित्वासाठीच्या लढाईचे समर्थन होणार आहे.

महाराष्ट्रातील शालेय शिक्षण रचनेचे नेमके चित्र डोळ्यांसमोर आणू या. माध्यमाच्या अंगाने विचार करता, महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठी आणि इतर माध्यमाच्या शाळांमध्ये इंग्रजी, उर्दू, गुजराती, कानडी, हिंदी वा क्वचित अन्य माध्यमांच्याही शाळा आहेत. असे जरी असले तरी शिक्षण चर्चाच्या वावटळीत प्रामुख्याने माध्यमाचा प्रश्न आणि मालकीचा प्रश्न हे दोन प्रश्न आहेत. शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न हा मराठी विरूध्द इंग्रजी या संदर्भातीलच आहे.

**मराठी - इंग्रजी माध्यमाचा प्रश्न**

महाराष्ट्रातील बहुसंख्य शाळा या मराठी माध्यमाच्या आहेत, आणि या मराठी शाळांमधील बहसंख्या शाळा सरकारी मालकीच्या (म्हणजे, जिल्हा परिषदा, नगरपालिका वा समाजकल्याण खात्याखाली येणाऱ्या आश्रमशाळा इत्यादी) आहेत. खाजगी मराठी शाळांची संख्या तुलनेने कमी आहे.

या खाजगी मराठी शाळांमध्ये अलीकडच्या काळामध्ये दोन स्वतंत्र वर्ग निर्माण झाले आहेत. एक आहे अनुदानित शाळांचा व दुसरा विना-अनुदानित शाळांचा. असे दोन वर्ग असणे असे शासनाचेच धोरण आहे. शासनमान्यता मात्र दोन्ही गटांतील शाळांना घ्यावी लागते. इतर राज्यांप्रमाणे, शाळा स्थापन करून केवळ नोंदणी करण्याची प्रथा येथे नाही. प्रचलित कायद्यानुसार, मान्यताप्राप्तीसाठी आधी शाळा स्थापन करून मग सरकारला मान्यतेचा प्रस्ताव सादर करावा लागतो. २००५ आणि २००८ साली सरकारने मागितल्यावरून हजारो शाळांचे प्रस्ताव सादर झाले, व काही शाळांना सरकारी बंदीमुळे प्रस्तावाच दाखल करता आले नाहीत. आजतागायत त्यांना मान्यता प्राप्त न झाल्यामुळे, मान्यताप्राप्त नसलेल्या खाजगी मराठी शाळांचा एक नवा वर्ग अस्तित्वात आला आहे. त्यांमधील काही शाळा चालूच झालेल्या नसून उरलेल्या शाळा ह्या व्यवस्थितरित्या चालू आहेत; पालकांनी आपल्या मुलांना या शाळांतून दाखल केले आहे. मुले शाळांमधून रोज जात आहेत, शिकत आहेत. दरवर्षी नैसर्गिक वाढीनुसार या शाळांमधून वरचे वर्ग उघडले जात आहेत. परंतु मुलांना अधिकृत दाखले देण्यास, सरकारी परीक्षांना बसण्यास अडचणी येत आहेत. या किंवा अशा अनेक अडचणी ह्या शाळांच्या मान्यतेच्या प्रश्नाशीच प्रामुख्याने निगडित आहेत.

शिक्षण हक्क समन्वय समितीने, मराठी अभ्यासकेंद्राच्या सहाय्याने, सुमारे शंभर शाळांची तपासणी केली. ही एकूण चालू असलेल्या खाजगी ( विनाअनुदानित, अ-मान्यताप्राप्त ) शाळांची नमुना पाहणी मानता येईल. या शाळा सर्व महाराष्ट्रभर विखुरलेल्या शाळा असून यापैकी बहुसंख्य शाळा प्राथमिक स्तरावरील तर काही शाळा माध्यमिक स्तरावरील आहेत.

**मराठी शाळा**

सरकारला वाटले शाळेत इंग्रजी शिकवण्यापेक्षा इंग्रजी शाळाच काढाव्या. मग या शाळांना मुले हवीत म्हणून सरकारने खाजगी शाळा बंद करण्याचे फर्मान काढले. पण काही मुले, सरकारी मराठी शाळांत जातच होती. मग तेथे वाईट शिकवण्याचे, सरकारने शिक्षकांना प्रशिक्षण दिले आता तीही मुले इंग्रजी शाळांकडे वळताहेत! ब्रिटीश सरकारने लंडनमध्ये मराठी शाळा काढल्याचे वृत्त आहे! शहाणपण म्हणाले.

**जागरूक पालक**

एक पालक जागरूक होता; त्याने मुलाला पहिलीतच शिकवणी लावली. त्यामुळे शेजारचा पालक जास्त च जागरूक झाला. त्याने मुलाला बालवाडीतच क्लासला घातले. तिसरा एक पालक आणखीनच जागरूक झाला. त्याने शिकवणीच्या वर्गातच आपले मूल जन्माला घातले. चौथ्या पालकाने जागरूकतेत आघाडी घेऊन आईच्या पोटातच मुलाला बाहेरून शिकवणी लावली. मुले जन्माला येण्याआधी शिकवणी जन्माला आली आहे! शहाणपण म्हणाले.

**शिक्षा**

एका शिक्षिकेने तिसरीतल्या मुलीला कपडे काढण्याची शिक्षा दिली म्हणे ! दुसऱ्या एका शिक्षिकेने तिसरीतल्या मुलीला मुती झाली म्हणून ती प्यायला लावली म्हणे ! तिसऱ्या एका शिक्षिकेने शिक्षिकांसाठी शिक्षा करण्याची स्पर्धा लावली. चौथ्या एका शिक्षिकेने तीव्र शिक्षा निर्मितीसाठी संशोधन केंद्र उभारल्याचे ऐकिवात आहे !

आत्ता मुले शिक्षांसाठी शाळेत जातील आणि घरी शिकतील ! शहाणपण म्हणाले.

❖